संक्षिप्त

देवलापार येथे वाघाचा मृत्यू

नागपूर : देवलापार वन्यजीव व प्रादेशिक विभागाच्या जंगलालगत १३ जूनला सकाळी वनकर्मचाऱ्यांना वाघाचा कुजलेला मृतदेह आढळून आला. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मानक कार्यपद्धतीनुसार पेंच व्याघ्रप्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. किशोर मानकर, प्रादेशिक उपवनसंरक्षक डॉ. भारत सिंह हाडा, दक्षता पथकाचे विभागीय अधिकारी पी. कोडापे यांच्या उपस्थितीत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बबिता मेश्राम, डॉ. राजेश फुलसंगे, डॉ. मयंक बरडे आणि प्राधिकरणाचे प्रतिनिधी म्हणून अजिंक्य भटकर तसेच मुख्य वन्यजीव रक्षकाचे प्रतिनिधी म्हणून मंदार पिंगळे यांच्या उपस्थितीत मृत वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदन अहवाल व प्रयोगशाळेत पाठवलेल्या नमुन्याच्या तपासणी अहवालानंतरच वाघाचे वय व वाघ होता की वाघीण हे कळून येईल. वाघाचे सर्व दात, नखे व अवयव शाबूत आहेत. पुढील तपास सहाय्यक वनसंरक्षक पांडूरंग पाखले करत असल्याचे वनविभागाने कळवले आहे.

बँकांमध्ये सोमवारपासून विशेष सप्ताह

नागपूर : जिल्ह्यात पीककर्ज वाटपाची प्रगती अत्यंत असमाधानकारक असून यामध्ये सुधारणा करा, असे सांगतानाच एकही शेतकरी कर्जापासून वंचित राहू नये, या उद्देशाने १६ते २२ जून या दरम्यान खरीप पीककर्ज वाटप सप्ताह प्रत्येक बँकेत आयोजित करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले. नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक बँक शाखेत तालुकानिहाय सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि बँकेचे शाखा व्यवस्थापक यांनी एकत्र बसून याचे परिणामकारक नियोजन करावे, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. यासंदर्भात शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे उपस्थित होते. नागपूर जिल्ह्यात १२ जून २०२५ अखेर पीक कर्ज वाटपाची प्रगती अत्यंत असमाधानकारक असून यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक खबरदारी घेऊन पीककर्जाबाबत अर्जाची प्रक्रिया, आवश्यक असणारे कागदपत्रे, पात्र लाभार्थी निवड याबाबत स्वतंत्र शिबीर घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

नागपुरात विमानाला पक्षी धडकल्याच्या घटना

आपतकालीन 'लँडिंग'मुळे प्रवाशाचे जीव वाचले

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : शहरात विमानाला पक्षी धडकल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे विमानाचे आपतकालिन लँडिंगही करावे लागले आहे. प्रत्येकीवेळी वैमानिकाने कौशल्य वापरून विमान सुरक्षितपणे खाली उतरवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर अलिकडे तीन घटनांची नोंद झाली आहे. या घटनांमध्ये २०१८ मध्ये रायपूर-नागपूर आणि नागपूर ते नवी दिल्ली विमानाला पक्षी धडकला होता . नवी दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला नागपूर विमानतळावर लँडिंग करताना पक्षी धडकला होता. २०२३ मध्ये नागपूर-पुणे इंडिगो विमानाला पक्षी धडकला. त्यामुळे उड्डाण रद्द करण्यात आले होते. विमानाला पक्षी धडकताच वैमानिकांनी विमान त्वरित धावपट्टीवर उतरवले होते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

वैमानिकाच्या कौशल्याची परीक्षा

विमान उड्डाणाला सज्ज झाल्यानंतर विमानाच्या इंजिनमध्ये समस्या असल्यास किंवा पक्षी विमानाला आदळल्यास किंवा प्रणालीमध्ये बिघाड झाल्यास अपघात होऊ शकतो. अशावेळी वैमानिकाला काही सेकंदात निर्णय घ्यावा लागतो.

शासकीय निवासी शाळा पुरस्काराने सन्मानित

नागपूर : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या कामठी तालुक्यातील वारेगावच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, समाज कल्याण आयुक्त प्रविण पुरी यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्रादेशिक उपायुक्त डॉ.सिद्धार्थ गायकवाड, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, मुख्याध्यापक विलास गायकवाड व शुभांगी खापेकर यांनी स्वीकारला.

संचमान्यतेच्या नवीन निकषाचा फटका !

मराठी शाळांचे अस्तित्व धोक्यात?

जाचक निकष रद्द करण्याची मागणी

नागपूर: राज्यात संचमान्यतेच्या नवीन निकषामुळे अनेक शाळांमध्ये पटसंख्या असूनही शिक्षक नाहीत. त्यामुळे मराठी माध्यमांच्या शाळांचे अस्तित्व संपुष्टात येते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. या गंभीर विषयाची दखल घेत भाजप शिक्षक आघाडीच्या वतीने संचमान्यतेचे जाचक निकष तात्काळ रद्द करावे, अशी मागणी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

शिक्षक आघाडीचे पूर्व विदर्भ अध्यक्ष अनिल शिवणकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने मंत्रालयात भुसे यांची भेट घेतली. निवेदनानुसार, १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयातील विद्यार्थी-शिक्षक प्रमाण तरतुदी या बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ शी विसंगत आहे. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी शाळांच्या संचमान्यता निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. मात्र, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांना अतिरिक्त ठरवणे व आंतरजिल्हा बदली करणे याकरिता १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयाला जून १६ जून २०२५ पर्यंत यथास्थितीत ठेवण्यात आले आहे. तर दुसरीकडे या शासन निर्णयातील निकषानुसार खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांना अतिरिक्त करणे, त्यांचे संस्थांतर्गत समायोजन करणे व इतर शाळांमध्ये समायोजन करणे सुरू आहे. ही बाब मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील नियम २५ अन्वये दिलेल्या विद्यार्थी शिक्षक प्रमाणाचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणात अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही निवेदनात नमूद आहे. शिष्टमंडळात डॉ. प्रशम कोल्हे. अनिल शिवणकर, किशोर पाटील, सुनील मोरे, शेखर कुलकर्णी, संजय भातलवंडे, संदीप खेडेकर आदींची उपस्थिती होती.

'श्यामची आई'चे सादरीकरण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : साने गुरुजींच्या ७५व्या स्मृतिदिनानिमित्त ११ जूनला सुरेश भट सभागृहात साने गुरुजींच्या अभिजात कलाकृतीवर आधारित 'श्यामची आई' या महानाट्याचे सादरीकरण करण्यात आले. ज्येष्ठ दिग्दर्शक प्रभाकर ठेंगडी लिखित आणि दिग्दर्शित या नाटकाची निर्मिती स्वरमंथन नागपूरची होती. निर्माता मोहन पात्रीकर, सूत्रधार मोहन नाहातकर संयोजकद्वय नारायण जोशी आणि उज्ज्वला अंधारे होत्या.

श्यामच्या आईची भूमिका रोहिणी मोहरील यांनी केली. भाऊच्या भूमिकेतील मनीष मोहरील होते. लहान शामच्या भूमिकेत अनिकेत कोल्हेकर तर मधल्या शामची भूमिका विघ्नेश पाठक होते. अनिल पालकर साने गुरुजीच्या भूमिकेत होते. इतर भूमिकांमध्ये शोभना मोहरील, मुकुंद वसुले, विष्णू मनोहर, वीरेंद्र लाटणकर, गीता काळे, मंगेश बावसे होते. तांत्रिक बाजू, नेपथ्य, सतीश काळबांडे, प्रकाश योजना, किशोर बत्तासे, रंगभूषा, लालजी श्रीवास, ध्वनिमुद्रण, चारुदत्त जिचकार ध्वनी संयोजन बंडू पदम यांनी सांभाळल्या. पार्श्वगायन, गुणवंत घटवाई, मनीष मोहरील आणि वीणा उकुंडे व नृत्य निर्देशक मृण्मयी मोहरील होते.

एकूण ६० कलावंत यात सहभागी होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला पद्मश्री डॉक्टर विलास डांगरे, माजी आमदार अशोक मानकर, प्रकाश एदलाबादकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी माजी शिक्षक आमदार नागो गाणार आणि हेमंत डोणगावकर उपस्थित होते.

व्हीएनआयटीच्या चमूला पारितोषिक

नागपूर : भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये मिशन लाईफ अंतर्गत 'आयडिया लाईफ स्पर्धा' आयोजित केली होती. व्हीएनआयटीच्या चमूचे सदस्य डॉ. मकरंद एम. लोखंडे, डॉ. प्रकाश एस. कुलकर्णी आणि डॉ. प्रवीण डी. सावरकर यांनी 'ऊर्जा वाचवा' या विषयावर पेटंट केलेल्या सोलर कुकरची कल्पना सादर केली. पाणी वाचवा, पाणी कमी करा, ई-कचरा कमी करा, प्लास्टिकला नकार द्या, शाश्वत अन्न प्रणाली स्वीकारा, निरोगी जीवनशैली स्वीकारा, असा संदेश यातून देण्यात आला. व्हीएनआयटीच्या चमूने त्यांच्या नाविन्यपूर्णतेसाठी प्रथम पारितोषिक जिंकले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते व्हीएनआयटीला चमू स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता उपस्थित होत्या. या यशासाठी संचालक प्रा. प्रेमलाल पटेल यांनी व्हीएनआयटीच्या चमूचे अभिनंदन केले.

डाळींच्या दरात किलोमागे पंधरा रुपये घट

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : तूर, मूग, हरभरा आदी डाळींच्या खरेदीमध्ये सध्या मंदी असून, ग्राहकांकडून उठाव नसल्याने दरही किलोमागे दहा ते पंधरा रुपयांनी घसरले आहेत. तुरीचे उत्पन्नही यंदा १५ ते २० टक्क्यांनी वाढले आहे. २०२३-२०२४ च्या हंगामानुसार देशात ४०.०४ लाख हेक्टर क्षेत्रावर ३०.३४ लाख टन तुरीचे उत्पादन झाले आहे. तर महाराष्ट्रातील ११.११ लाख हेक्टरवर ८.८९ लाख टन उत्पादन झाले आहे.

जानेवारी ते मार्चदरम्यान, नवीन तूर बाजारात दाखल होते. यासह एप्रिल-मे महिन्याच्या कालावधीत डाळींसह गहू-ज्वारी आदी धान्यांचीही घरात साठवणुकीच्या दृष्टीने खरेदी केली जाते. यंदा मे महिन्याच्या मध्यातून सुरू झालेल्या पावसाळी वातावरणाने डाळींची खरेदी मंदावलेली आहे. आता जूनमध्ये गहू, ज्वारी व डाळींची खरेदी थांबलेली असते. पावसाळ्यात धान्याला कीड लागण्याचा धोका अधिक असल्याने ग्राहक खरेदी करीत नाहीत, असे व्यापारी सांगतात.

> तूरडाळीचे उत्पादन वाढले आहे. सरकारकडून डाळवर्गीय पिकांची खरेदी बंद आहे. शिवाय यंदा मे महिन्याच्या मध्यापासूनच पावसाळी वातावरण सुरू झाले आहे. पावसाळ्यात धान्याची खरेदी तशी होत नाही.
> - श्रेणिक मुनोत, डाळ मिल उद्योजक

कर्ज फेडण्यासाठी तीन किलो सोन्याची लूट

१२ तासांत ५ जणांना अटक

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : नागपाडा परिसरात दुचाकीवरून आलेल्या चौघांनी सराफाच्या पेढीतील दोन कर्मचाऱ्यांना अडवून त्यांच्याकडील सुमारे तीन किलो सोने लुटल्याची घटना गुरुवारी घडली होती. गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांनी केलेल्या कारवाईत १२ तासांमध्ये म्हणजे शुक्रवारी पाच जणांना अटक करण्यात आली.

विनायक अजय दळवी, शहनवाज हुसैन खान, मंगेश पंढरीनाथ शिंदे, अब्दुल हकीम अब्दुल कादीर शेख आणि संतोष जैन अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून दीड किलो वजनाचे लगड आणि दीड किलो वजनाचे सोन्याचे दागिने म्हणजे दोन कोटी ५५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

आरोपीनी झटपट श्रीमंत होण्यासाठी तसेच कर्ज फेडण्यासाठी हा साहसी दरोडा घातला होता. त्यातील संतोष जैन हा यापूर्वी चोरी झालेल्या सोन्याच्या पेढीत कामाला होता. याप्रकरणी नागपाडा पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना गुरूवारी सकाळी ९ च्या सुमारास नागपाड्यातील डायना पुलावर ही घडली. त्यात सराफ पेढीत कार्यरत दोन कर्मचारी लोअर परळ येथील दागिने निर्मिती करणाऱ्या युनिटमध्ये सोने घेऊन जात होते. आरोपी बराच वेळ त्याचा पाठलाग करत होते. डायना पुलावर आरोपींनी त्यांच्या दुचाकीसमोर आपली दुचाकी उभी केली. त्यांना अडवल्यानंतर दुचाकीवर मागे बसलेल्या आरोपीने उतरून कर्मचाऱ्याच्या हातातील बॅग हिसकावली.

जयंत पवार स्मृती संमेलनाच्या अध्यक्षपदी अनिल गवस

मालवण येथे २२ जून रोजी कार्यक्रम

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : साहित्य अकादमी विजेते ज्येष्ठ कथाकार, नाटककार,नाट्य समीक्षक जयंत पवार स्मृती संमेलन समाज साहित्य प्रतिष्ठान सिंधुदुर्ग आणि बॅ. नाथ पै सेवांगण मालवण यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जून रोजी सकाळी १० वाजता मालवण येथील बॅ. नाथ पै सेवांगणच्या सभागृहात आयोजित केले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते - नाट्यदिग्दर्शक अनिल गवस यांची निवड करण्यात आल्याची माहिती समाज साहित्य प्रतिष्ठानचे संस्थापक तथा संमेलनाचे आयोजक कवी अजय कांडर यांनी दिली.

संमेलनाचे उद्घाटन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक ॲड. देवदत्त परुळेकर हे करणार असून उद्घाटन सत्रानंतर 'जयंत पवार यांचे कथात्म साहित्य' या विषयावर नामवंत समीक्षक आणि जयंत पवार यांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. दत्ता घोलप (वाई) यांचे व्याख्यान होणार आहे. तर संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात अभिनेते अनिल गवस यांची 'जयंत माणूस आणि लेखक कलावंत' या विषयावर प्रकट मुलाखत घेण्यात येणार आहे.

तसेच ज्येष्ठ कवयित्री संध्या तांबे यांच्या अध्यक्षतेखाली मराठीतील ५५ निमंत्रित कवींच्या सहभागाने कविसंमेलन रंगणार आहे.

पंजाब नॅशनल बँक punjab national bank

मंडळ कार्यालय - नाशिक
बुडलँड टॉवर, गंगापूर रोड, नाशिक ४२२००५, दू क्र. ०२५३-२३१६२१२

कवठाळ शाखेसाठी जागेची आवश्यकता

पंजाब नॅशनल बँक खालील **शाखा आणि एटीएम** जागेकरीता **"दोन बोली पध्दतीमध्ये प्रस्ताव"** मागवित आहेत. जागा संमती व्यावसायिक संकुलामध्ये किंवा राज्य सरकारच्या व्यारे व्यावसायिक वापरासाठी विहित करण्यात आलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या इमारतीमध्ये असावी. कन्व्हर्जन / पार्किंग चार्जेस /तसेच स्टॉग रुमचे बांधकाम आणि योग्य बीन पुरवठ्याच्या संमतीसाठी होणारा खर्च मालकाने करावयाचा आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव
१.	कवठाळ
ठिकाणासाठी प्राधान्य	
१.	कवठाळ, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा शहराच्या मध्यवर्ती भागात
मजला	
तळमजल्यावर	
अंदाजे क्षेत्रफळ (कार्पेट) आवश्यक	
१२००-१५०० स्क्वे.फुट (एटीएम सह)	

पुरेशा पार्किंगसह (निःशुल्क) सुयोग्य जागा असलेल्या संस्थांनी उपरोक्त नमूद करण्यात आलेले चटई क्षेत्रफळ आणि जागेसह बँकेच्या डिझाईन आणि स्पष्टीकरणाच्या अनुसार बांधकाम फेरफार करण्यास इच्छुक असलेल्या पक्षकार त्यांचे प्रस्ताव दोन भागांमध्ये म्हणजेच तांत्रिक आणि वित्तिय बोली मागवित आहे, दोन्ही सवर बोली (तांत्रिक आणि व्यावसायिक असे चिन्हांकित केलेले) वेगवेगळ्या लिफाफ्यामध्ये मोहरबंद करावे आणि नंतर एका मोठ्या लिफाफ्यामध्ये त्यावर **कवठाळ, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा महाराष्ट्र, शाखेच्या** जागेसाठी प्रस्ताव असे ठळकपणे लिहून **पंजाब नॅशनल बँक, मंडळ, कार्यालय- नाशिक, बुडलँड टॉवर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००५** हयांच्याकडे **३० जून २०२५ पर्यंत** किंवा त्यापूर्वी पाठवावे. बोली कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये (२ रा आणि ४ था शनिवार वगळता) स. १० वा. ते सायं. ५. वा. पर्यंत स्विकारण्यात येतील. तांत्रिक आणि वित्तिय बोलींसाठी नमुना उपरोक्त नमूद पत्यावर प्राप्त करता येईल किंवा www.pnbindia.in. डाऊनलोड करता येईल. कृपया लक्षात ठेवा, जमीन मालकाच्या बतीने ब्रोकर्स / प्रोपर्टी डीलर्स / रिअल इस्टेट एजन्सीव्यारे प्राप्त झालेले अर्ज पूर्णपणे नाकारले जातील. बँकेकडून ब्रोकरेज दिले जाणार नाही कोणतेही कारण न देता कोणताही / सर्व प्रस्ताव नाकारण्याचे अधिकार बँक राखून ठेवत आहे.

दिनांक - १४/०६/२०२५ — सही/- मंडळ प्रमुख

OMKARA ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय: कोहिनूर स्क्वेअर, 47 वा मजला, एन.सी. केळकर मार्ग, आर.जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई, 400028, संपर्क क्र.- 9773406175

[परिशिष्ट -IV- ए] [नियम 9(1) सह वाचण्यात येणाऱ्या नियम 8(6) ची तरतूद पाहावी]

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधीलनियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) च्या तरतुदीसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्व लोकांना आणि खासकरून कर्जदार **मे. अफझल ट्रेडिंग आणि मे. हारिस ट्रेडिंग कंपनी आणि मे. किसान आलू कंपनी** आणि सह-कर्जदार श्रीमती निगार सुलताना खालिद नदीम खॅन (प्रोप्रा. मे. हारिस ट्रेडिंग कंपनी) मो. अफझल हझीफअझरूलरहीम खॅन, मे. अफझल ट्रेडिंग कंपनी प्रा.लि., श्री खालिद रहीम अख्तरखा, मे. एम.डी. बिल्डर्स अँड लँड डेव्हलपर्स, श्री खालीम नदीम अख्तरखा (प्रोप्रा. मे. किसान आलू कंपनी), मो. अफझल हझीफअझरूलरहीम खॅन (प्रोप्रा. मे. अफझल ट्रेडिंग कंपनी), फरहाना शबनम, पतीचे नाव मो. अफझल खॅन, यांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे खालील वर्णनाच्या अचल मालमत्ता तारण/भारग्रस्त आहेत. सदर मालमत्तांचा ताबा नागपूर नागरिक सहकारी बँक (एनएनएसबी) सुरक्षित धनको यांच्या प्राधिकृत अधिकारयांनी घेतला असून तिची दिनांक 13.06.2018 रोजी नुसार **रु. 4,58,76,974/- (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लक्ष शहात्तर हजार नऊशे चौऱ्याहत्तर फक्त) अधिक व्याज व इतर खर्च इतक्या रकमेच्या वसूलीसाठी "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", आणि "तेथे जे काही आहे" आणि कोणताही पर्याय नाही या तत्वावर 01.07.2025 रोजी सका. 11.00 वाजता** (बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ 30.06.2025 रोजी सायं 6.00 वाजता) विक्री करण्यात येईल.

ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओमकारा पीएस 47/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे) यांनी दिनांक 21.03.2022 रोजीच्या अधिहस्तांकन करारान्वये नागपूर नागरिक सहकारी बँक (एनएनएसबी) यांचेकडे अंतर्निहित असलेल्या अनामतीसह वरील कर्जदार / जामीनदार यांचे विरुद्ध असलेले संपूर्ण थकबाकी कर्ज अधिग्रहीत केले आहे. त्यामुळे मे. ओमकारा असेट्स रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. हे वर नमूद कर्जदार आणि सह-कर्जदारसुरक्षित धनको बनले आहेत.

अचल मालमत्तांचे वर्णन, आरक्षित किंमत व बयाणा रक्कम तसेच ज्ञात बोजे इ. चा तपशील खालीलप्रमाणे आहे:

मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम
1. जमीन क्षेत्रफळ सुमारे 65162 चौ.फू. (6053.747 चौ.मी.) यात 0.71% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, संपूर्ण जमीन खसरा क्र. 183, मौजा-नागपूर, महानगर पालिका घर क्र. 644, 644-ए, 644-बी आणि 644-सी, सिटी सर्वे क्र. 204, शीट क्र. 152 आणि 153, स्मॉल फॅक्टरी एस्टेट, बागडगंज लेआऊट, भंडारा रोड, नागपूर, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23, तहसील आणि जिल्हा नागपूर, यासह संपूर्ण आरसीसी बांधकाम सदनिका क्र. सी-103, एकुण बिल्ट-अप क्षेत्रफळ 79.347 चौ.मी. किंवा सुमारे 854.09 चौ.फू., पहिला मजला, सदर जमिनीवरील प्रीतम कॉम्प्लेक्स यात, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23, चतु:सीमा: उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस- पॅसेज आणि सदनिका धारकांची पार्किंग, पूर्वेस- सदनिका क्र. सी104, पश्चिमेस- सदनिका क्र. सी-102. **आणि** जमीन क्षेत्रफळ सुमारे 65162 चौ.फू. (6053.747 चौ.मी.) यात 0.71% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, संपूर्ण जमीन खसरा क्र. 183, मौजा-नागपूर, महानगर पालिका घर क्र. 644, 644-ए, 644-बी आणि 644-सी, सिटी सर्वे क्र. 204, शीट क्र. 152 आणि 153, स्मॉल फॅक्टरी एस्टेट, बागडगंज लेआऊट, भंडारा रोड, नागपूर, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23, तहसील आणि जिल्हा नागपूर, यासह संपूर्ण आरसीसी बांधकाम सदनिका क्र. सी-102, एकुण बिल्ट-अप क्षेत्रफळ 79.347 चौ.मी. किंवा सुमारे 854.09 चौ.फू., पहिला मजला, सदर जमिनीवरील प्रीतम कॉम्प्लेक्स यात, नागपूर महानगर पालिकेच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 23, चतु:सीमा: उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस- पॅसेज आणि सदनिका धारकांची पार्किंग, पूर्वेस- जिना आणि सदनिका क्र. सी103, पश्चिमेस- सदनिका क्र. सी-101. **(एकत्रित केलेली सदनिका)**	रु. 81,00,000/-	रु. 8,10,000/-
2. जमीन क्षेत्रफळ सुमारे 1.21 हेक्टर म्हणजे 3.00 एकर वाचा दक्षिण भाग, संपूर्ण जमीन शेत सर्वे क्र. 113, क्षेत्रफळ सुमारे 2.45 हेक्टर म्हणजे 6.053 एकर, जमीन महसूल मूल्यांकन रु. 9.69 वार्षिक, भोगवटदार वर्ग क भूस्वामी अधिकार, मौजा-म्हसाळा, पटवारी हलका क्र. 15, तहसील कामठी, जिल्हा नागपूर, त्यावरील उभे असलेली पिके, झाडे आणि जमिनीवर उभे असलेले काहीही व सर्वकाही, यासह वाहिवाटीचे जसे की रस्ता, धुरा इत्या. चे सर्व अधिकार, चतु:सीमा: उत्तरेस- शेत सर्वे क्र. 113 चा उर्वरित भाग, पूर्वेस- शेत क्र. 112, पश्चिमेस- शेत क्र., दक्षिणेस -शेत क्र. 111/3	रु. 52,80,000/-	रु. 5,28,000/-

ई-लिलावाचा दिनांक	01/07/2025 रोजी दु. 1.00 ते दु. 2.00 वा.
किमान बोली वृद्धी रक्कम	रु. 25,000/- (रुपये पन्नास हजार मालमत्ता 1 साठी) रु. 25,000/- (रुपये पन्नास हजार मालमत्ता 2 साठी)
सहभागाचे बोलीपत्र/ केवायसी कागदपत्रे / बयाणा रकमेच्या भरण्याचा पुरावा सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ	30.06.2025 रोजी सायं. 6.00 वा.
पाहणीचा दिनांक	27/06/2025 रोजी दु. 1.00 ते 4.00 वाजेपर्यंत
ज्ञात दायीत्वे	आमच्या सर्वोत्तम ज्ञानानुसार व उपलब्ध असलेल्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणतीही बोजी नाहीत. तरी, इच्छुक बोलीदारांनी लिलावात काढलेल्या मालमत्तांवरील बोजे, मालकी हक्काबाबत स्वतंत्र चौकशी करावी.

हे प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) सह वाचण्यात येणारया नियम 8(6) अंतर्गत कर्जदार / सह-कर्जदारांसाठी असलेली पंधरा दिवसांची सूचनादेखील आहे.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर म्हणजे http://omkaraarc.com/auction.php येथे दिलेली लिंक पाहावी तसेच प्राधिकृत अधिकारी प्रतीक्षा पटेल (संपर्क क्र. 9773406175 आणि सांकेत डोंगर-7020954784 येथे आणि ईमेल: pratiksha.patel@omkararc.com संपर्क साधावा. बोलीदार वेबसाईटला http://www.bankeauction.com येथे भेट देऊ शकतात किंवा सेवा पुरवठादार मे. सी१ इंडिया प्रा.लि., टेली. हेल्पलाईन: +91-7291981124 / 25/ 26, हेल्पलाईन ई-मेल आयडी: support@bankeauctions.com, श्री भाविक पांड्या, मोबाईल: 88666 82937 ई-मेल-Maharashtra@c1india.com येथे भेट द्यावी.इच्छुक बोलीदारांना नादारी व दिवाळखोरी संहिता 2016 च्या अनुच्छेद 29ए चे पालन करीत घोषणापत्र द्यावे लागेल.

दिनांक: 14.06.2025
स्थान: नागपूर

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
ओमकारा ॲसेटस् रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
(ओमकारा पीएस 47/2021-22 ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून काम पाहणारे)

Dyanranjan Krida Bhau-Uddeshiya Sanstha,
Khaperkheda Road, Po. Ta. Parseoni, Dist. Nagpur.

Saibaba Arts And Science College,

AtPo.Ta. Parseoni, Khaperkheda Road, Tal. Parshivani, Dist. Nagpur-441105.
NACC 'B' GRADE ACCRIDATED

Applications are invited from eligible candidates for the following post(s) of Principal.

Subject	No. of Post	Nature of Post	Nature of vacancy	Category	No. of Advertisement
PRINCIPAL	Principal -1	Full Time	Clear-Non-Granted	Open - 1	First Time - 1

• Par Scale - As Per UGC & State Government Norms.
• Essential Qualifications :- i) Ph.D. degree; ii) Professor/Associate Professor with a total service/experience of at least Fifteen years of teaching/research in Universities Colleges and other Institutions of higher education; iii) A minimum of 10 research publications in peer-reviewed or UGC- listed Journals; and iv) A minimum of 110 Research Score as per Appendix II, Table 2 of Direction No. 20 of 2019 and Govt. Resolution dated 8th March, 2019.

Note :- Tenure : A College Principal shall be appointed for a period of five years, extendable for another term of five years on the basis of performance assessment by a Committee appointed by the University, constituted as per Rules.

The application may be made on a plain paper/prescribed proforma & addressed to the President / Secretary of the Management on the address given below along with a crossed postal order / DD of Rs. 100/- drawn in the favour of the Principal of the college concerned and certified copies of the relevant certificate testimonials towards substantiation of eligibility in terms of academic qualifications, teaching experience, NOC/Resignation from previous college and the research score sheet shall have to be attached certified be the Principal.

Last date for submission of application with relevant document : 30-06-2025.

Date: 14-06-2025

President / Secretary
Dyanranjan Krida Bhau-Uddeshiya Sanstha,
Khaperkheda Road, Po. Ta. Parseoni, Dist. Nagpur.

Canara Bank

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेन्ट ब्रँच : सर्कल ऑफिस बिल्डिंग, 'बी' विंग, ८वा मजला, सी-१४, जी-ब्लॉक, बीकेसी, बांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ । **ई-मेल :** cb15550@canarabank.com

स्वीस चॅलेंज प्रोसेसअंतर्गत सहभागी होऊन परवानगी असलेल्या संस्थांकरिता कर्जा टर्मिनल अँण्ड लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड (''केटीएलपीएल'')च्या स्ट्रेस्ड लोन एक्स्पोजरच्या हस्तांतरणासंबंधित स्वारस्याची अभिव्यक्ती (''ईओआय'') मागविणारी जाहिरात

कॅनरा बँक (**''सीबी''**), कॅनरा बँक, बँक ऑफ बडोदा व पंजाब अँण्ड सिंध बँक (एकत्रीतरित्या **''धनको''** किंवा **''कन्सोर्टियम धनको''**) समाविष्ट धनकोंच्या कन्सोर्टियमच्या वतीने भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा (**''आरबीआय''**) निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूत्रे तसेच लागू कायद्यांतर्गत पात्र/ अनुमती दिलेल्या एआरसी'ज/ बँक्स/ एनबीएफ